MHKO030049212026

**समरी फौजदारी केस नंबर ३३९३/२०२६**
**निशाणी क्रमांक /सी**

**भारतीय नागरीक सुरक्षा संहिताच्या २०२३ चा अधिनियम बावीस कलम २८६ प्रमाणे संक्षिप्त संपरीक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख**

**श्री. अ.वि. मुसळे, ३ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर यांचे न्यायालयात**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याची तारीख | : | २४/०४/२०२६ |
| २. | फिर्याद दाखल झाल्याची तारीख | : | २४/०४/२०२६ |
| ३. | फिर्यादीचे नांव व पत्ता | : | महाराष्ट्र शासन तर्फे<br>राजारामपुरी पोलीस ठाणे |
| ४. | आरोपीचे नांव व पत्ता | : | **संजू संभाजी परळकर**<br>वय – ३५ वर्षे, धंदा – व्यवसाय<br>रा.प्लॉट नं.९, शिरगांवकर कॉलनी,<br>टाकाळा, कोल्हापूर |
| ५. | गुन्हयाचे कलम | : | भारतीय न्याय संहिता कलम २८५ प्रमाणे. |

**६. ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीस समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील.**

दिनांक २४/०४/२०२६ इ. रोजी १९.१५ वा. चे सुमारास शिवाजी विद्यापीठ ते आर्मी कॅन्टीन जाणारे रोडवरील के.एस.बी.पी. गार्डनचे जवळील खाऊ गल्ली, कोल्हापूर येथील सार्वजनिक रस्त्यावर तुम्ही तुमच्या ताब्यातील पांढ–या रंगाची चारचाकी स्विफट कार क्रमांक एच.आर.–०७–ए.डी.–७२२३ सार्वजनिक वाहतुकीचे रोडवर उभी करुन रस्त्यावरील येणा–या व जाण–या लोकांना व इतर लोकांना धोका व अटकाव होईल अशा पध्दतीने लावल्याचे स्थितीत मिळून आल्याने तुम्ही **भारतीय न्याय संहिता कलम २८५** प्रमाणे गुन्हा केला आहे.

७. **आरोपीचे प्रथिकथन.**

प्रश्न १ – तुम्हाला पोलिस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तर. – होय.

प्रश्न २ – तुम्हाला आता तुमचेवरचा दोषारोप मराठीतून समजावून सांगितला तो समजला काय ?
उत्तर – होय.
प्रश्न ३ – तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर – होय, मला गुन्हा कबूल आहे.

समोर,

दिनांकः– ०८/०७/२०२६.

Digitally signed by ANIKET MUSALE
Date: 2026.07.08 17:42:13 +0530

–––––––
**आरोपीची सही.**

(अ.वि. मुसळे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.३, कोल्हापूर.

आरोपीने स्वतःहून अर्ज देवून भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८५ प्रमाणेचा गुन्हा कबूल केला आहे. आरोपीचे म्हणणे ऐकले. आरोपीने सदरचा गुन्हा केल्याचे मान्य करुन कमीत कमी दंडाची शिक्षा करण्याची विनंती केली आहे.

गुन्हयाचे स्वरुप आणि आरोपीचे कबूलीचे कथन यांचा विचार करता आरोपीला द्रव्यदंडाची शिक्षा देणे न्यायोचित होईल. करीता मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आ दे श</u>**

आरोपी **संजू संभाजी परळकर** यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७५ नुसार भारतीय न्याय संहिता कलम २८५ अंतर्गत दोषी ठरविणेत येत असून, आरोपीने या गुन्हयासाठी रक्कम रुपये **१००/– (रुपये शंभर फक्त)** मात्र द्रव्यदंड जमा करावा अशी शिक्षा सुनावण्यात येत आहे. द्रव्यदंड जमा न केलेस आरोपीस **०१** दिवस साधी कैद सुनावण्यात येत आहे.

Digitally signed by ANIKET MUSALE
Date: 2026.07.08 17:42:18 +0530

दि.०८/०७/२०२६

(अ.वि. मुसळे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.३, कोल्हापूर.